# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**6 JULY, 2018**

[Time : 11-30]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करू नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाइन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

थंडीचे दिवस संपले की, ऋतुराज वसंताचे आगमन होते, फाल्गुनातील होळी रंगाची उघळण करून जाते न जाते, तोच वसंत ऋतुची चाहूल लागते. शिशिराच्या थंडीने गारठून गेलेली सृष्टी नव्या उमेदीने पुन्हा एकदा जादूगार वसंताचा रंगबहार शेला अंगावर पांघरायला तयार होते.

वसंत हा ऋतुचा राजा खरा, पण काही काळ तो आपला राजेशाहीपणा विसरून जातो. बाजूला ठेवतो आणि आपल्या चैतन्यमय खेळात निसर्ग देवतेला सामील करून घेतो. हा लाभसवाणा सोहळा पहायला सूर्य आकाशात संध्याकाळी उशीरापर्यंत रेंगाळू लागतो. कोकीळेच्या सुरात सूर मिसळत बुलबुल सारखा इतर पक्षीगण या आनंद सोहळ्यात सामील होतात.

ऋतुराजाच्या आगमनाने अवघ्या सृष्टीचा कायापालट होतो. धरती आणि आकाशही नवनव्या रंगांची उघळण करतात. आंब्यांच्या झाडांवर फुललेल्या माहोराचा सुगंध हळूच कुजबुजतो, शिशिर संपला, उठा आणि वसंताच स्वागत करा. काजू, शेवगा यांवर फुललेली नाजूक फुले फळांच्या आगमनाची सुवार्ता देतात. शिशिराची झाडे जांभळट गुलाबी व नाजूक फुलांनी नटतात. जाई, जुई, सायली, मोगरा, चंपक ही सारी सुगंधी मंडळी ऋतुराज वसंताला सोनेरी सायंकाळी सुगंधाची उटी लावतात. वनांमुळे अनेक प्रकारचे उत्पन्न मिळते. हवा थंड राहते.

---